# जगदीश खेबुडकर यांचे चित्रपटबाहय गीत लेखन

**डॉ मंजुषा समर्थ**
मराठी विभाग
आर्टस् कॉलेज सिहोरा, जि.भंडारा

---

१९४८ च्या गांधी हत्येनंतर झालेल्या दंगली मध्ये खेबुडकरांचे घर पेटविण्यात आले आपल्या जळत्या घराकडे पहातया संवेदनशील मनाने टाहो फोडला व या कवीचा जन्म झाला त्यावेळी त्यांनी 'मानवते तू विधवा झालीसे' ही कविता लिहली. गेली ५० वर्षे खेबुडकरांनी महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील मराठी मनाला आपल्या अवीट गोडीच्या गीतांनी व कवितांनी प्रसन्न केले आहे. कविवर्य खेबुडकर हे मराठी चित्रपटसृष्टीतील एक फार मोठा चमत्कार होते. सहज जाता जाता लिहलेल्या आपल्या चित्रगीतांतून या कवी यापूर्वी मराठी कवितांची बदलती रूपे शोधण्याचा प्रयत्न केला आहे त्याची कविता सामजिक जाणिवांचा एक महत्त्वाचा घटक बनून जाते.

त्यांच्या काही कविता गायनानुकुलतेमुळे चित्रगीतांच्या माध्यमातुन मराठी मनावर अधिराज्य गाजवू लागल्या खेबूडकरांनी जवळ जवळ २५०० गीते व ३००० कविताचे लेखन केले आहे. चित्रपट कथानकाच्या अनुषंगाने त्यांनी गीतलेखन केले व त्यामुळे त्यांना गीतकार खेबुडकर नावानेच ओळखले जाऊ लागले. ही एक बाजू आहे, परंतु या कविने केवळ चित्रपटांसाठीच गीते लिहिली नाहीत तर आपला भाविष्कार करणारी काही चित्रपट – बाहय गीते व कविता लिहलेल्या आहेत. त्यातील काही प्रकाशित स्वरूपात आहेत. तर काही अप्रकाशित स्वरूपात आहेत. त्यामध्ये भक्तिगीते, बालगीते, स्त्रीगीते, लोकगीते इत्यादीचा समावेश आहे. या लेखात त्यांच्या प्रकाशित चित्रपटेतर गीतांचा आढावा घेतला आहे.

**अंबाबाईची गाणी :**

कोल्हापूरच्या देवीचे भक्त असणा–या जगदीश खेबुडकरांनी स्वयंस्फूर्तीने ही भक्तिगीते वेगवेगळया विषयावर व रचनेत लिहून ही प्रासादिक गीतकार प्रकाशित केली. यामध्ये विविध ३६ अशा संख्येची गीतरचना असून भूपाळी, ओव्या, काकडा, पंचामृत स्नान, वस्त्रालंकार, नैवेद्य (घास), गोंधळ, जोगवा, पंचारती, आरती, देवीचा जागर, मंदिर महीमा, देवीचे स्तुतीपर गीत (गौरव), अभंग, धावा यांचा समावेश आहे. या शिवाय करुणाकष्ट, भजन, स्तवन यासह अंबाईचे दृष्टीने गाणे लिहून या गीतकारांनी श्री अंबाबाई च्या चरणी भक्ति भाव समर्पित केला. विशेषत: नवविधा भक्ती ना अनुसरुन आपल्या भाव माध्यमातून विश्व संधारणेच्या दृष्टी–ने तसेच नैतिकतेचे अधिष्ठान बळकट होण्यासाठी, भक्तमने तृप्ती होण्यासाठी व अंत:करणात भावसंचार होण्यासाठी श्री खेबुडकरांची ही रचना यशस्वी ठरली आहे.

**रामदर्शन :**

सुप्रसिध्द गीतकार ग. दि. माडगूळकररचित 'गीत रामायण' विख्यात झाले आहे. त्याच धर्तीवर जगदीश खेबुडकर यांनी ही 'रामदर्शन' सादर करून श्री प्रभू रामचंद्रांच्या समग्र जीवनाचा आलेख शब्दबध्द केला आहे. गद्यपद्य मिश्रीत लेखन–शैलीत एकूण २५ छोटया छोटया भागात लिहून, प्रभू श्रीरामचंद्रासारखा अलौकिक वीरपुरूषा–चे चरित्र वाचकांसमोर सादर केले आहे. संपूर्ण रामयणाचे प्रतिबिंब या गीतकाराने आपल्या प्रतिभा सामर्थ्याने अविष्कृत करून दाखविले ही गीतरचना सोपी आणि प्रासादिक व भक्ती रसप्रधान आहे. रामयणाच्या कथाभागाचे संपूर्ण दर्शन (श्रावणबाळापासून ते भूमी प्रवेशापर्यंतचा) या गीतकाराने सजीव करण्यासाठीची

Research Hub International Journal

किमया साधली आहे हेच याचे वैशिष्टय होय. लावणी आणि भावगीते लिहणा–या जगदीश खेबुडकरांना भक्तीरसाचे अधिष्ठान असलेले हे 'रामदर्शन' (गीत संग्रह) एकदातरी वाचले तरी त्यांचे मोठे पण समजून घेता येईल.

**भक्तीचा मळा :**

जगदीश खेबुडकरांचे सश्रध्दा भावमन या गीतसंग्रहातूनव्यक्त झाले आहे देवा धर्माकडे तसेच सज्जन, मंदिर देऊळ यांच्या विषयी भक्तीभाव व्यक्त झालेल्या या गीत संग्रहात त्यांचा आध्यात्मिक, पारमार्थिक दृष्टिकोन ही दिसून येतो. ब–याच गीतलेखनात भक्तीचा मळा फुलवताना ईश्वराची माहिती सांगितली आहे तर विविध देवदेवातांची भक्तीगीते लिहून गीतकारांनी आपली भक्तीगीते लिहून गीतकारानी आपली भक्तीभावना त्यांचे चरणी समर्पित केली. उदा. : या संग्रहात देवतांविषयक गीतरचना आढळते. उदा. : वक्रतुंड महाकाय देव गणपती (पृ. ५३)

या शिवाय संताविषयी देखील भक्तीभाव प्रकट करणारी गीताची रचना आढळते. उदा. : श्री ज्ञानदेव ऐसा ज्ञानदेव (पृ. १८)

जगदिश खेबुडकरांनी या 'भक्तीचा मळा' फुलविणा–या गीतसंग्रहात बहुतांश सर्व देवदेवता, संत–सत्पुरूष, सद्‌गुरू यांचेवर सश्रद्ध भावाने गीतलेखन केले. अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत श्री विठ्ठलाची भक्तीगीते देखील लिहिली आहेत. ही चित्रपटबाहय आधुनिक भक्तीगीते लिहून गीतकाराने सश्रद्ध भावमनाचे दर्शन घडविले. वेगवेगळया प्रकारची आणखी काही भक्तीरचनाही (उदा. भुपाळी) समाविष्ट आहेत. ही सर्वच अर्थपूर्ण, रसाळ गीतरचना म्हणूनच ओळखली जातात.

टाळया चिपळया (भक्तीगीत संग्रह) हरिभजनात तल्लिन होणा–या कीर्तन पंरपरेला उपयुक्त ठरण्यास हा गीतसंग्रह मोलाची कामगिरी बजावतो.

टाळ बोले चिळीला, नाच माझ्या संगे,<br>
देवाजी च्या दारी आज, रंगला अभंग (पृ. ७)

माणसाच्या मनात अध्यात्माचे संस्कार होण्यासाठी भक्ती–रस–पूर्णलेखनाची नितांत गरज असल्साचे लक्षात आल्यामुळे अशा प्रकारची रचना त्यांनी केल्याचे स्पष्ट होते. मंडप व्यावस्था, सजावट, मिरवणूक, पुजाअर्चा यांची केलेली वर्णने व जयघोष गीतकाराच्या भावानुभूतीची व संवेदनक्षमतेची पचिती आणून देतात. गीतकार जगदीश खेबुडकरांनी श्री गणेशा ची नावीन्यपूर्ण आरतीही लिहली आहे. 'दिमदिम दिमदिम दिमडी बोले', गजानना जय गजानना, छुम छुम बोले ..... टाळ मंजिरी, मंत्र, आपुला मुखी म्हणा (पृ. ४६) श्री गणेश चतुर्थी वेळेस मूर्तीची पोड्शोपचार पूजा करून प्रतिष्ठापना केली त्यावेळी हे आरती गीत त्यांना स्फूरले. देवाच्या विविध रूपातील भक्ती गीते ही जगदीश खेबुडकरांनी या गीत संग्रहासाठी लिहली. माता अनसुयेला अनसुये आई असे म्हणताना गीतकार शरणागत झाले आहेत (पृ. १७) पुढच्या गीत लेखनात देवीच्या मंगलमय मंत्राच्या आधारे गीत रचताना करवीरची महालक्ष्मी, तुळजापूरची, माहूरची अंबाभवानी व वणीची सप्तश्रृंगी या सर्वांना 'देवी नमोस्तुते केले आहे (पृ. १८) श्री भगवान शकंराचा विविध अवतार महिमा सांगणारी काही गीते टाळाचिपळ्या या संग्रहात समाविष्ट झाली आहे.

नऊरंगी गीते – जगदीश खेबुडकर म्हणत, 'बाई असल्या शिवाय आई होता येत नाही' मी कवी आहे साहित्यिक आहे म्हणून गीतकार आहे. महाराष्ट्रातील रसिक लोकांनी त्यांना साहित्यिक म्हणून ओळखावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांचा मुख्यत: चित्रपटगीतकार म्हणूनच खूप प्रसिध्दी मिळाली. मुख्य म्हणजे चित्रपटागीता व्यतिरीक्त स्वंतत्रपणे त्यांना गीत लेखन करून आपल्या प्रतिभेच्या वेगळेपणाचे दर्शन घडविले



Research Hub International Journal

त्यानुसार त्यांच्या पश्चात्य संकृती प्रकाशन, पुणे यांनी सौ. अंगाई खेबुडकर महाजनी यांच्या सहकार्याने 'नऊरंगी गीते' संग्रह प्रकाशित केला. मात्र यामध्ये स्वत: गीतकार जगदीश खेबुडकरांचे मनोगत समाविष्ट नाही वेगवेगळ्या रचनेच्या, वर्गीकरणाच्या एकुण ५६ गीत रचनांचा हा असल्याचे लक्षात येते. या नवरंगी गीतलेखनातील अनुक्रमणिकेत गीत रचनेचा प्रकार ही नोंदवला हे विशेष आहे व पुढे गीताचे नाव दिले आहे त्यामुळे या गीतकारांची ओळख या गीताच्या अंतरंगातून ही स्पष्ट होते. ऐतिहासिक व राजकीय समाजसेवकांचे पोवाडे (पृथ्वी–राज चव्हाण किसनवीर) गांधी गौरवगीत यासह प्रेमगीत, निरोपगीत, बाल–गीत, अंगाईगीत, प्रार्थना–नमन, तकार–गीत, संग्रामगीत, स्वांतत्र्य–गीत, संदेश–गीत, लोक गीत (बोली–गीत), नृत्यगीत, विनोदी–गीत, लावणी, मुरळीगीत आणि झगडा अशा रचनांचा समावेश आहे. एकूणच लोककवी म्हणून या गीतकारांना चांगल्यापैकी ओळखले जाते. भारतीय इतिहासातील वीर पुरूषांचा अभिमान पुढील पोवाड्यातून व्यक्त झाला आहे.

'हा भारत आमुचा मान, फुले धनधान्य सोन्याची खाण;
अंगावर नवरत्नांचा साज, देशप्रेमाचा चढता सरताज
गाऊया कवने त्याची आज जी जी जी जी... (पृ. ७)

या गीतसंग्रहात पृथ्वीराज चव्हाण यांचा पोवाडा आणि किसनवीर गौरव पोवाडा हेच प्रदीर्घ गीतलेखन असून उर्वरीत स्फूट उत्स्फूर्त व छोट्या कडव्यांचे गीत लेखन झालेले आहे.

समस्त महिला वर्गाला संदेश देणारे गीत बोधप्रद आहे. हे गीत समाज प्रबोधनपर गीतांचा एक चांगला नमूना आहे.

'महिलांनो, चला उठा, पुकारा... आरोग्य सुधारा हो, आरोग्य सुधारा!'
महिला सबलीकरण व सशक्तीकरणाचे प्रतिबिंब यामध्ये पडले आहे. (पृ. ४१)

या गीतसंग्रहात 'लोकगीत' म्हणून उल्लेख करण्यात आलेले गीत 'स्त्रीगीत' म्हणूनच नोंदविले पाहिजे. कारण त्यांना 'कर्ता' असून त्या गीतकारांच्या नावानेच समाविष्ट झाली आहेत. विविध भावरम्यतेचे व स्त्रीमनाचे दर्शन यामधून घडते. 'आता होईल साखर पुडा गं' (पृ. ४३) यामधून साखरपुड्याच्या कार्यक्रमाची धांदल आणि नंतर विवाहाचे स्वप्नरंजन रेखाटले आहे. एक ग्रामीण स्त्रीगीतही बोलीभाषेद्वारे ग्रामीण वातावरणाची झलक दाखविते.

लाडकी लेक ब–याच दिवसांनी माहेराला आल्यामुळे आईला मायेचा पाझर फुटला आणि लेकीकडे बघून ती म्हणते...

'लाडकी लेक माझी आली माहेराला गं
मीठ मोह–यांनी तिला ओवाळा ओवाळा गं.....' (पृ. ४६)

हीच आई मुलीला सासरी पाठवताना अश्रुपूर्ण भावनेने विहिण बाईला म्हणते,

'ही माया भारी... हृदया लावी लाळा...
हो विहीण बाई... लेक दिली सांभाळा!' (४७)

महिलांचा आवडत्या गौरीच्या सणाचे व श्रावण भाद्रपदातील वातावरणाचे हृदयगम चित्रणही यथातथ्य केले आहे.

'आला ग सखे आज सण गौरीचा...
केलास कसा थाट नव्या नवरीचा!' (पृ. ४८)

यातच नवविवाहिताचे रूपसौंदर्य 'पिसारा फुलला ग माझ्या पदराचा' हेही तिने आवर्जुन सांगितले. याशिवाय काही शृंगारप्रचूर लावण्यांची झलक दिसते.

'या रिंगणात तू, मी दोघे खडे' (सलामी – पृ. ६२)

'आंबट गोड, पिवळी फोड– पाणी सुटलं तोंडाला

आला हो राया... आंब्याचा मोसम आला' (पृ. ६३)

ही लावणीगीते मनमोहक, लक्षवेधी आहेत. उपरोक्त 'ओलेती उभी जल परी' ही लावणी मात्र प्रदीर्घ, ठासकेबाज आहे. लावणीगीताची लेखनशैली प्रसन्न आहे.

जगदीश खेबुडकरांना स्फुरलेली, अवती–भवतीच्या परिस्थितीचे अवलोकन – निरीक्षण करून लिहिलेली भावमनाचा आविष्कार झालेली ही गीते रसिक मनाला भावतातच! त्यात सहज उत्स्फुर्तता, लोकभावानुभूतीचे उत्कट दर्शनही घडते.

**बालगीते :**

**अ) चिमणचारा :**

जगदीश खेबुडकरांनी लहानमुलांच्या भावनेशी समरस होवून ही बालगीते लिहिली असून त्यांच्या पश्चात त्यांची कन्या सौ. अंगाई खेबुडकर महाजनी यांनी हा संग्रह प्रकाशित केला. त्या पुस्तकाच्या मनोगतात खेबुडकर म्हणतात, 'लहानपण देगा देवा... मुंगी साखरेचा रवा' 'आयुष्याच्या संध्याकाळी आठवणारी बालपणाची पहाट' असे म्हणतात. बालपणाशी नाते सांगणारी व बालभावनेशी समरस होणारी ही गीते सर्वांसाठी (आबालवृध्दांसह) 'चिमणचारा' ठरतील, यात शंकाच नाही. या गीतसंग्रहात प्रार्थनागीत, भक्तीगीत (गुरुस्तुती, शारदागीत, गुरूगौरवगीत) आईविषयक (सांगशील आई, आईचे काळीज) देशभक्ती – (क्रांतीवीर, भारतगौरव, एकता गीत) यासह वडिलधा–या मंडळीवर काही गीतलेखन केले आहे. काही धम्माल गीतेही समाविष्ट आहेत. यातील बालवीराने स्वत:ला शिवबा समजून छोट्या मावळयांना गोळा करून स्फूर्तीही दिली व पराक्रम करण्यासाठी दिवाळीचा किल्ला करून, त्यावर हल्ला करण्याची अभिनव योजना आखली आहे. लहान मुलांचे जग हे नेहमी आनंदाचे राज्य असते. त्यांच्या निरागस भावमनाचे दर्शन या गीतसंग्रहाचे घडविले. अतिशय सोप्या, सुलभ व मुलांच्या भाषेला शोभतील अशी सहज, सुलभ गीतरचना वाचकाला बालपणीच्या आठवणीत रमवितात. लहानमुलांना देशप्रेम, क्रांतिवीर, भारतमाता, देवधर्म, ज्ञान, संस्कारशीलता यांचे संस्कार होण्यास ही सर्वच गीते उपयुक्त व मार्गदर्शक आणि प्रेरक ठरतात. गीतकार हे स्वत: माध्यामिक शिक्षक असल्याने मूल्यशिक्षणाचे महत्व ओळखून ही बालगीते लिहिली असावित असे वाटते.

**ब) फुलोरा :**

या फुलोरातील बालगाणी आबालवृध्दांसही आंनद मिळवून देतात. अशी छोटी–छोटी ३९ गीते बालमनाचे दर्शन घडवितात. दैनंदिन व्यवहारातील तसेच शिक्षणाशी संबंधीत ही गीतरचना बळीराजा, सैनिक, आई, जवान यांची महती सांगतात. याशिवाय 'प्रिय देश हा', 'वीरगाथा', संचलनगीत, स्वातंत्र्यगीत, महाराष्ट्र गौरव ही गीतेही लहान मुलांना संस्कारशील, ध्येयवादी बनविण्यात मार्गदर्शक व प्रेरक ठरतात. संगीतानुकूल गेयरचना, सोपी–सहज सुलभ भाषा, सहज भाषा, सहज मुखोद्‌गत होऊ शकणारी रचना यामुळे ही दखलपात्र ठरतात. ससा कासवाची गोष्टी गीतरचनेत सामावली गेली, तिही उद्‌बोधक वाटते. आईशी असणारे भावनिक जवळिक साधणारे गीत मातृहृदयाचा उत्कट आविष्कार घडविते. दिवाळी अभ्यास न करता आनंदाने साजरी करण्याचा या मुलांचा निश्चय लहीन मुलांचे मानसशास्त्र समजून घेण्यास मदत करते. त्या संदर्भात आणखी एक 'दिवाळीगीत' लिहून दिवाळीचा आनंद कसा लुटायचा याची माहीतीच मुलांनी दिली आहे. राष्ट्रीय

एकात्मता जपण्यासाठी देश बांधव एकत्र येतील व माणूस ही जात आणि माणुसकी हा धर्म मानतील व काळी आई एक, एक तिची माती' या शब्दात गीतकार संदेश देतात. (गीत – एकरूप नाती) एकूणच बालपणाचा अनुभव आणून देणारा 'फुलोरा' गीतसंग्रह वाचकांना भावतो.

**समारोप :**

एकूणच कवी आणि गीतकार म्हणून जगदीश खेबुडकरांनी आपले कर्तृत्व दाखवून दिले आणि सर्वांना आश्चर्यचकीत करून सोडले. मोठ्या संख्येने विविध मराठी चित्रपटांना गीत लेखन करण्याबरोबरच स्वतंत्रपणे गीतलेखन व काव्यलेखन करून छाप पाडली. स्वतःचा आत्मशोध घेताना सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणातील अनुभवही गीत–काव्य आणि गझल लेखनात शब्दबध्द केले आहेत. त्याआधारे त्यांचे स्वतंत्रपणे प्रकाशित झालेले चित्रपटबाह्य गीतसंग्रहाचा परामर्श घेतला आहे.

**संदर्भग्रंथ :**


- विश्वनाथ मुंगळे (सद्गुरू गुरूनाथ), 'अंबाबाईची गाणी', प्रस्तावना, ठाणे, प्र. अ, सप्टें २००७, पृ. क्र.७.
- जगदीश खेबुडकर, 'रामदर्शन', संस्कृती प्रकाशन, पुणे, द्वि. आ., २००९, पृ. क्र. ७.
- अंगाई खेबुडकर / महाजनी, मुलाखत, पुणे, दि. १२.०४.२०१६


Research Hub International Journal